.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 7 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ७ ॥

॥ दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा ॥ ७ ॥

समास पहिला : मंगलाचरण

॥ श्रीराम ॥

विद्यावंतांचा पूर्वजू । मत्तानन‌ु येकद्विजू ।
त्रिनयेन चतुर्भुजू । फरशपाणी ॥ १ ॥
कुबेरापासूनि अर्थ । वेदापासून परमार्थ ।
लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासी आले ॥ २ ॥
तैसी मंगळमूर्ती आद्या । तियेपासून जाल्या सकळ विद्या ।
तेणें कवि लाघवगद्या । सत्पात्रें जाहलीं ॥ ३ ॥
जैसी समर्थाचीं लेकुरें । नाना अलंकारीं सुंदरें ।
मूळपुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी ॥ ४ ॥
नमूं ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशपूर्णचंद्रा ।
जयाचेनि बोधसमुद्रा । भरतें दाटे बळें ॥ ५ ॥
जो कर्तृत्वास आरंभ । मूळपुरुष मूळारंभ ।
जो परात्पर स्वयंभ । आदि अंतीं ॥ ६ ॥
तयापासून प्रमदा । इच्छाकुमारी शारदा ।
आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे ॥ ७ ॥
जे मिथ्या म्हणतांच गोंवी । माईकपणें लाघवी ।
वक्तयास वेढा लावी । वेगळेपणें ॥ ८ ॥
जे द्वैताची जननी । किं ते अद्वैताची खाणी ।
मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ॥ ९ ॥
किं ते अवडंबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडें लगडली ।
मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ॥ १० ॥
वंदूं ऐसी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता ।
आतां आठवीन समर्था । सद्गुरूसी ॥ ११ ॥
जयाचेनि कृपादृष्टी । होय आनंदाची वृष्टी ।
तेणें सुखें सर्व सृष्टी । आनंदमय ॥ १२ ॥
किं तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक ।
कैवल्यपददायक । अनाथबन्धू ॥ १३ ॥
मुमुक्ष चातकीं सुस्वर । करुणां पाहिजे अंबर ।
वोळे कृपेचा जलधर । साधकांवरी ॥ १४ ॥
किं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारू ।
महाआवर्ती आधारू । भाविकांसी ॥ १५ ॥
किं तो काळाचा नियंता । नांतरी संकटीं सोडविता ।
किं ते भाविकाची माता । परम स्नेहाळ ॥ १६ ॥
किं तो परत्रींचा आधारू । किं तो विश्रांतीचा थारू ।
नातरी सुखाचें माहेरू । सुखरूप ॥ १७ ॥
ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी ।
देहेंविण लोटांगणीं । तया प्रभूसी ॥ १८ ॥
साधु संत आणि सज्जन । वंदूनियां श्रोतेजन ।
आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ १९ ॥
संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणती जन ।
माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे ॥ २० ॥
ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ अवघा ॥ २१ ॥
नाहीं सत्वाचें चांदणें । कांहीं मार्ग दिसे जेणें ।
सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ॥ २२ ॥
देहबुद्धिअहंकारे । निजले घोरती घोरे ।
दुःखें आक्रंदती थोरे । विषयसुखाकारणें ॥ २३ ॥
निजले असतांचि मेले । पुनः उपजतांच निजले ।
ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ २४ ॥
निदसुरेपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा ।
नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥ २५ ॥
त्या कष्टांचें निरसन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान ।
म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथीं ॥ २६ ॥
सकळ विद्यामध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार ।
दशमाध्यायीं शार्ङ्गधर । भगवद्गीतेंत बोलिला ॥ २७ ॥
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥
याकारणें अद्वैतग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ ।
पाववया तोचि समर्थ । जो सर्वांगें श्रोता ॥ २८ ॥
जयाचें चंचळ हृदय । तेणें ग्रंथ सोडूंचि नये ।
सोडितां अलभ्य होये । अर्थ येथींचा ॥ २९ ॥
जयास जोडला परमार्थ । तेणें पहावा हा ग्रंथ ।
अर्थ शोधितां परमार्थ । निश्चयो बाणे ॥ ३० ॥
जयास नाहीं परमार्थ । तयास न कळे येथींचा अर्थ ।
नेत्रेंविण निधानस्वार्थ । अंधास न कळे ॥ ३१ ॥
येक म्हणती मराठें काये । हें तों भल्यानें ऐकों नये ।
तीं मूर्खें नेणती सोयें । अर्थान्वयांची ॥ ३२ ॥
लोहाची मांदूस केली । नाना रत्नें सांठविलीं ।
तीं अभाग्यानें त्यागिलीं । लोखंड म्हणोनि ॥ ३३ ॥
तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत ।
नेणोनि त्यागिती भ्रांत । मंदबुद्धीस्तव ॥ ३४ ॥
अहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण ।
द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंचि नये ॥ ३५ ॥
परिस देखिला अंगणीं । मार्गीं सांपडला चिंतामणी ।

अव्हा वेल महागुणी । कूपामध्यें ॥ ३६ ॥
तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७ ॥
न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होय सुगम ।
सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ३८ ॥
जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।
सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ३९ ॥
म्हणोनि कारण सत्समागम । तेथें नलगे व्युत्पत्तिश्रम ।
जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि असे ॥ ४० ॥
भाषाभेदाश्च वर्तन्ते अर्थ एको न संशयः ।
पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥ १ ॥
भाषापालटें कांहीं । अर्थ वाया जात नाहीं ।
कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाचपासीं ॥ ४१ ॥
तथापि प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता ।
येऱ्हव्हीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ॥ ४२ ॥
आतां असो हें बोलणें । भाषा त्यागून अर्थ घेणें ।
उत्तम घेऊन त्याग करणें । सालीटरफलांचा ॥ ४३ ॥
अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करवी खटपट ।
नाना अहंतेनें वाट । रोधिली मोक्षाची ॥ ४४ ॥
शोध घेतां लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश
कैंचा ।
अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ॥ ४५ ॥
मुकेपणाचें बोलणें । हें जयाचें तोचि जाणें ।
स्वानुभवाचिये खुणें । स्वानुभवी पाहिजे ॥ ४६ ॥
अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा ।
जयासि बोलतां वाचेचा । हव्यासचि पुरे ॥ ४७ ॥
परीक्षावंतापुढें रत्न । ठेवितां होय समाधान ।
तैसें ज्ञानियापुढें ज्ञान । बोलावें वाटे ॥ ४८ ॥
मायाजाळें दुश्चित होये । तें निरूपणें कामा न ये ।
संसारिका कळे काये । अर्थ येथींचा ॥ ४९ ॥
व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ १ ॥
व्यवसायी जो मळिण । त्यासि न कळे निरूपण ।
येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसीं ॥ ५० ॥
नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चितपणें घेतां हानी ।
परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ॥ ५१ ॥
तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहातां कळेना ।
मराठेंचि उमजेना । कांहीं केल्या ॥ ५२ ॥
जेथें निरूपणाचे बोल । आणि अनुभवाची ओल ।
ते संस्कृतापरी सखोल । अध्यात्मश्रवण ॥ ५३ ॥
माया ब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म म्हणावें ।
तरी तें मायेचें जाणावें । स्वरूप आधीं ॥ ५४ ॥
माया सगुण साकार । माया सर्व विकार ।
माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ॥ ५५ ॥
माया दृश्य दृष्टीस दिसे । मायाभास मनास भासे ।
माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहातां ॥ ५६ ॥
माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप ।
मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी थोडी ॥ ५७ ॥
माया बहुरूप बहुरंग । माया ईश्वराचा संग ।
माया पाहातां अभंग । अखिल वाटे ॥ ५८ ॥
माया सृष्टीची रचना । माया आपली कल्पना ।
माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ॥ ५९ ॥
ऐसी माया निरूपिली । स्वल्प संकेतें बोलिली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ६० ॥
पुढें ब्रह्मनिरूपण । निरूपिलें ब्रह्मज्ञान ।
जेणें तुटे मायाभान । येकसरें ॥ ६१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
मंगलाचरणनिरूपणनाम समास पहिला ॥ १ ॥ ७.१

जय जय रघुवीर समर्थ ॥
समास दुसरा : ब्रह्मनिरूपण
॥ श्रीराम ॥
ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निराकार ।
ब्रह्मास नाहीं पारावार । बोलती साधू ॥ १ ॥
ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं येक ।
ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ २ ॥
ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत ।
ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ॥ ३ ॥
ब्रह्म दृश्यावेगळें । ब्रह्म शून्यत्वानिराळें ।
ब्रह्म इन्द्रियांच्या मेळें । चोजवेना ॥ ४ ॥
ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खास असेना ।
ब्रह्म सद्गुरुविण येइना । अनुभवासी ॥ ५ ॥
ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्मा ऐसें नाहीं सार ।
ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी ॥ ६ ॥
ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें ।
परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ॥ ७ ॥
ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत ।
ब्रह्मास हे दृष्टांत । देतां न शोभती ॥ ८ ॥
ब्रह्मासारिखें दुसरें । पाहातां काय आहे खरें ।
ब्रह्मीं दृष्टांतउत्तरें । कदा न साहती ॥ ९ ॥
यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥
जेथें वाचा निवर्तती । मनास नाहीं ब्रह्मप्राप्ती ।
ऐसें बोलिती श्रुती । सिद्धांतवचन ॥ १० ॥
कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मीं कल्पनाचि नाहीं ।
म्हणोनि हें वाक्य कांहीं । अन्यथा नव्हे ॥ ११ ॥
आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसेनि होईल प्राप्त ।
ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्गुरुविण नाहीं ॥ १२ ॥

भांडारगृहें भरलीं । परी असती आडकलीं ।
हातास न येतां किल्ली । सर्वही अप्राप्त ॥ १३ ॥
तरी ते किल्ली कवण । मज करावी निरूपण ।
ऐसी श्रोता पुसे खूण । वक्तयासी ॥ १४ ॥
सद्गुरुकृपा तेचि किल्ली । जेणें बुद्धी प्रकाशली ।
द्वैतकपाटें उघडलीं । येकसरां ॥ १५ ॥
तेथें सुख असे वाड । नाहीं मनासी पवाड ।
मनेंविण कैवाड । साधनांचा ॥ १६ ॥
त्याची मनाविण प्राप्ती । किं वासनेविण तृप्ती ।
तेथें न चले व्युत्पत्ती । कल्पनेची ॥ १७ ॥
तें परेहुनी पर । मनबुद्धिअगोचर ।
संग सोडितां सत्वर । पाविजे तें ॥ १८ ॥
संग सोडावा आपुला । मग पहावें तयाला ।
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९ ॥
आपण म्हणजे मीपण । मीपण म्हणजे जीवपण ।
जीवपण म्हणजे अज्ञान । संग जडला ॥ २० ॥
सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी ।
कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ २१ ॥
मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।
अज्ञान गेलिया पाविजे । परब्रह्म तें ॥ २२ ॥
देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण ।
तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ २३ ॥
ऊंच नीच नाहीं परी । रायारंका येकच सरी ।
जाला पुरुष अथवा नारी । तरी येकचि पद ॥ २४ ॥
ब्राह्मणांचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें
ओंवळें ।
ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ २५ ॥
ऊंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी ।
ऐसा भेद तयापाशीं । मुळींच नाहीं ॥ २६ ॥
सकळांस मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं अनेक ।
रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ॥ २७ ॥
स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।
सकळांसि मिळोनि येकचि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८ ॥
गुरुशिष्यां येकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद ।
परी या देहाचा संबंध । तोडिला पाहिजे ॥ २९ ॥
देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसि येकचि प्राप्ती ।
येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतीचें वचन ॥ ३० ॥
साधु दिसती वेगळाले । परी ते स्वस्वरूपीं मिळाले ।
अवघे मिळोनि येकचि जाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ॥
ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अधिक उणें ।
उणें भावील तें सुणें । देहबुद्धीचें ॥ ३२ ॥
देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
चुके समाधानसमयो । देहबुद्धियोगें ॥ ३३ ॥
देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण ।
मिथ्या जाणोन विचक्षण । निंदिती देह ॥ ३४ ॥
देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान ।
पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुद्धि मागुती ॥ ३५ ॥
देहाचेनि थोरपणें । समाधानासि आणिलें उणें ।
देह पडेल कोण्या गुणें । हेंही कळेना ॥ ३६ ॥
हित आहे देहातीत । म्हणोनि निरूपिती संत ।
देहबुद्धीनें अनहित । हो)ऊंचि लागे ॥ ३७ ॥
सामर्थ्यबळें देहबुद्धि । योगियांस तेही बाधी ।
देहबुद्धीची उपाधी । पैसावों लागे ॥ ३८ ॥
म्हणोनि देहबुद्धि झडे । तरीच परमार्थ घडे ।
देहबुद्धीनें बिघडे । ऐक्यता ब्रह्मींची ॥ ३९ ॥
विवेक वस्तूकडे ओढी । देहबुद्धि तेथूनि पाडी ।
अहंता लावूनि निवडी । वेगळेपणें ॥ ४० ॥
विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें ।
सत्य ब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ॥ ४१ ॥
सत्य ब्रह्म तें कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।
प्रत्युत्तर दे आपण । वक्ता श्रोतयासी ॥ ४२ ॥
म्हणे ब्रह्म येकचि असे । परी तें बहुविध भासे ।
अनुभव देहीं अनारिसे । नाना मतीं ॥ ४३ ॥
जें जें जया अनुभवलें । तेंचि तयासी मानलें ।
तेथेंचि त्याचें विश्वासलें । अंतःकरण ॥ ४४ ॥
ब्रह्म नामरूपातीत । असोनि नामें बहुत ।
निर्मळ निश्चळ निवांत । निजानन्द ॥ ४५ ॥
अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपरंपार ।
अदृश्य अतर्क्य अपार । ऐसीं नामें ॥ ४६ ॥
नादरूप ज्योतिरूप । चैतन्यरूप सत्तारूप ।
स्वस्वरूप साक्षरूप । ऐसीं नामें ॥ ४७ ॥
शून्य आणि सनातन । सर्वेश्वर आणि सर्वज्ञ ।
सर्वात्मा जगज्जीवन । ऐसीं नामें ॥ ४८ ॥
सहज आणि सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत ।
शाश्वत आणि शब्दातीत । ऐसीं नामें ॥ ४९ ॥
विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमळ वस्तु व्योमाकार ।
आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ॥ ५० ॥
परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन ।
चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं ॥ ५१ ॥
ऐसीं नामें असंख्यात । परी तो परेश नामातीत ।
त्याचा करावया निश्चितार्थ । ठेविलीं नामें ॥ ५२ ॥
तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम ।
तें येकचि परब्रह्म । दुसरें नाहीं ॥ ५३ ॥
तेंचि कळावयाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चयो बाणे ॥ ५४ ॥
खोटें निवडितां येकसरें । उरलें तें जाणिजे खरें ।

चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ॥ ५५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
ब्रह्मनिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ ७.२

समास तिसरा : चतुर्दशब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतों ब्रह्मज्ञान ।
जेणें होये समाधान । साधकाचें ॥ १ ॥
रत्नें साधायाकारणें । मृत्तिका लागे येकवटणें ।
चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । जाणिजे तैसीं ॥ २ ॥
पदार्थेंविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत ।
पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतांचि न ये ॥ ३ ॥
आधीं मिथ्या उभारावें । मग तें वोळखोन सांडावें ।
पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ॥ ४ ॥
म्हणोन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळाया सिद्धांत ।
येथें श्रोतीं सावचित । क्षण येक असावें ॥ ५ ॥
पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मीतिकाक्षरब्रह्म ।
तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ॥ ६ ॥
चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म ।
साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ॥ ७ ॥
आठवें सगुणब्रह्म । नवें निर्गुण ब्रह्म ।
दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८ ॥
अनुभव तें अक्रावें । आनंदब्रह्म तें बारावें ।
तदाकार तेरावें । चौदावें अनुर्वाच्य ॥ ९ ॥
ऐसीं हे चौदा ब्रह्में । यांचीं निरोपिलीं नामें ।
आतां स्वरूपाचीं वर्मे । संकेत दाऊं ॥ १० ॥
अनुभवेंविण भ्रम । या नांव शब्दब्रह्म ।
आतां मीतिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ॥ ११ ॥
खंशब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म ।
आतां बोलिले सूक्ष्म । सर्वब्रह्म ॥ १२ ॥
पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्व दृष्टीस पडे ।
तें तें ब्रह्मचि रोकडें । बोलिजेत आहे ॥ १३ ॥
या नांव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म ।
आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ॥ १४ ॥
पंचभूतादि मायेतें । चैतन्यचि चेतवितें ।
म्हणौनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ॥ १५ ॥
चैतन्यास ज्याची सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्वतां ।
तये सत्तेस जाणता । या नांव साक्षब्रह्म ॥ १६ ॥
साक्षत्व जयापासुनी । तेंहीं आकळिलें गुणीं ।
सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ॥ १७ ॥
जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्वतां ।
वाच्यब्रह्म तेंहि आतां । बोलिजेल ॥ १८ ॥
जें वाचें बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें ।
अनुभवासि कथिलें । न वचे सर्वथा ॥ १९ ॥
या नांव अनुभवब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म ।
परंतु याचेंही वर्म । बोलिजेल ॥ २० ॥
ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद ।
अनुर्वाचीं संवाद । तुटोन गेला ॥ २१ ॥
ऐसीं हे चौदा ब्रह्में । निरूपिलीं अनुक्रमें ।
साधकें पाहातां भ्रमें । बाधिजेना ॥ २२ ॥
ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत ।
चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ॥ २३ ॥
शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण माईक ।
शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ॥ २४ ॥
जेएं क्षर ना अक्षर । तेथें कैंचें मीतिकाक्षर ।
शाश्वताचा विचार । तेथेंहि न दिसे ॥ २५ ॥
खंब्रह्म ऐसें वचन । तरी शून्यातें नासी ज्ञान ।
शाश्वताचें अधिष्ठान । तेथेंहि न दिसे ॥ २६ ॥
सर्वत्रास आहे अंत । सर्वब्रह्म नासिवंत ।
प्रळये बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ॥ २७ ॥
ब्रह्मप्रळये मांडेल जेथें । भूतान्वय कैंचा तेथें ।
म्हणौनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ॥ २८ ॥
अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण ।
आकारास विचक्षण । मानीतना ॥ २९ ॥
जें निर्माण पंचभूत । तें प्रत्यक्ष नासिवंत ।
सर्वब्रह्म हे मात । घडे केंवीं ॥ ३० ॥
असो आतां हें बहुत । सर्वब्रह्म नासिवंत ।
वेगळेपणास अंत । पाहाणें कैंचें ॥ ३१ ॥
आतां जयास चेतवावें । तेंचि माईक स्वभावें ।
तेथें चैतन्याच्या नावें । नास आला ॥ ३२ ॥
परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्वतां ।
पदार्थेंविण साक्षता । तेही मिथ्या ॥ ३३ ॥
सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये ।
सगुणब्रह्म निश्चयें । नासिवंत ॥ ३४ ॥
निर्गुण ऐसें जें नांव । त्या नांवास कैंचा ठाव ।
गुणेंविण गौरव । येईल कैंचें ॥ ३५ ॥
माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ ।
कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलेंचि ॥ ३६ ॥
ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेंविण जीवात्मा ।
अद्वैतासी उपमा । द्वैताची ॥ ३७ ॥
मायेविरहित सत्ता । पदार्थेंविण जाणता ।
अविद्येविण चैतन्यता । कोणास आली ॥ ३८ ॥
सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वही गुणांचपासीं ।
ठाईचें निर्गुण, त्यासी- । गुण कैंचे ॥ ३९ ॥
ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत ।
तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसीं ॥ ४० ॥
निर्गुण ब्रह्मासी संकेतें । नामें ठेविलीं बहुतें ।

तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ॥ ४१॥
आनंदाचा अनुभव । हाही वृत्तीचाचि भाव ।
तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४२॥
अनुर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें ।
तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ॥ ४३॥
अनुर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती ।
निरोपाधि विश्रांती । योगियांची ॥ ४४॥
वस्तु जे कां निरोपाधी । तेचि सहज समाधी ।
जेणें तुटे आदिव्याधी । भवदुखाची ॥ ४५॥
जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत ।
सिद्धांत आणी वेदांत । धादांत आत्मा ॥ ४६॥
असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम ।
अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ॥ ४७॥
आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।
मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८॥
निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।
मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९॥
कल्पनेचें येक बरें । मोहरितांच मोहरे ।
स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५०॥
निर्विकल्पास कल्पितां । कल्पनेचि नुरे वार्ता ।
निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ॥ ५१॥
पदार्था ऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरून द्यावें ।
असो हें अनुभवावें । सद्‌गुरुमुखें ॥ ५२॥
पुढें कथेच्या अन्वये । केलाचि करूं निश्चये ।
जेणें अनुभवासि ये । केवळब्रह्म ॥ ५३॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चतुर्दशब्रह्मनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३॥ ७.३

समास चवथा : विमलब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म नभाहूनि निर्मळ । पाहातां तैसेंचि पोकळ ।
अरूप आणी विशाळ । मर्यादेवेगळें ॥ १॥
येकवीस स्वर्गें सप्त पाताळ । मिळोन येक ब्रह्मगोळ ।
ऐसें अनंत तें निर्मळ । व्यापून असे ॥ २॥
अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें ।
तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं ॥ ३॥
जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐसी वदे लोकवाणी ।
तेणेंविण रिता प्राणी । येकही नाहीं ॥ ४॥
जळचरां जैसें जळ । बाह्य अभ्यंतरीं निखळ ।
तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रासी ॥ ५॥
जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां न ये ।
म्हणोनि उपमा न साहे । जळाची तया ॥ ६॥
आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्वतां ।
तैसा तया अनंता । अंतचि नाहीं ॥ ७॥
परी जें अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें ।
अति निकट परी चोरलें । सकळांसि जें ॥ ८॥
तयामध्येंचि असिजे । परी तयासी नेणिजे ।
उमजे भास, नुमजे । परब्रह्म तें ॥ ९॥
आकाशामध्यें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ ।
परी तें मिथ्या निवळ । आकाशचि असे ॥ १०॥
नेहार देतां आकाशीं । चक्रें दिसती डोळ्यांसी ।
तैसें दृश्य ज्ञानियांसी । मिथ्यारूप ॥ ११॥
मिथ्याचि परी आभासे । निद्रितांसी स्वप्न जैसें ।
जागा जालिया आपैसें । बुझों लागे ॥ १२॥
तैसें आपुलेनि अनुभवें । ज्ञानें जागृतीस यावें ।
मग माईक स्वभावें । कळों लागे ॥ १३॥
आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापैलीकडे ।
तेंचि आतां निवाडें । उमजोन दावूं ॥ १४॥
ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थासी व्यापून ठेलें ।
सर्वांमध्यें विस्तारलें । अंशमात्रें ॥ १५॥
ब्रह्मामध्यें सृष्टी भासे । सृष्टीमध्यें ब्रह्म असे ।
अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ॥ १६॥
अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी ।
सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ॥ १७॥
अमृतीमध्यें आकाश । सगळें सांठवतां प्रयास ।
म्हणोन तयाचा अंश । बोलिजे तो ॥ १८॥
ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें ।
सर्वांत परी संचलें । संचलेपणें ॥ १९॥
पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत ।
पंकीं आकाशीं अलिप्त । असोनि जैसें ॥ २०॥
ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे ।
परी दृष्टांतीं साहित्य पडे । विचारितां आकाश ॥ २१॥
खंब्रह्म ऐसी श्रुती । गगनसदृशं हे स्मृती ।
म्हणोन ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ॥ २२॥
काळिमा नसतां पितळ । मग तें सोनेंचि केवळ ।
शून्यत्व नसतां निवळ । आकाश ब्रह्म ॥ २३॥
म्हणोन ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन ।
आढळे परी दर्शन । नव्हे त्याचें ॥ २४॥
शब्दसृष्टीची रचना । होत जात क्षणक्षणां ।
परंतु ते स्थिरावेना । वायूच ऐसी ॥ २५॥
असो ऐसी माया माईक । शाश्वत तें ब्रह्म येक ।
पाहों जातां अनेक । व्यापून असे ॥ २६॥
पृथ्वीसि भेदूनि आहे । परी तें ब्रह्म कठिण नव्हे ।
दुजी उपमा न साहे । तया मृदुत्वासी ॥ २७॥
पृथ्वीहूनि मृदु जळ । जळाहूनि तो अनळ ।
अनळाहूनि कोमळ । वायु जाणावा ॥ २८॥
वायूहूनि तें गगन । अत्यंतचि मृदु जाण ।

गगनाहूनि मृदु पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९ ॥
वज्रास असे भेदिलें । परी मृदुत्व नाहीं गेलें ।
उपमेरहित संचलें । कठिण ना मृदु ॥ ३० ॥
पृथ्वीमध्यें व्यापूनि असे । पृथ्वी नासे तें न नासे ।
जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ॥ ३१ ॥
तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना ।
गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ॥ ३२ ॥
शरीरीं अवघें व्यापलें । परी तें नाहीं आढळलें ।
जवळीच दुरावलें । नवल कैसें ॥ ३३ ॥
सन्मुखचि चहूंकडे । तयामध्यें पाहाणें घडे ।
बाह्याभ्यंतरीं रोकडें । सिद्धचि आहे ॥ ३४ ॥
तयांमध्येंचि आपण । आपणां सबाह्य तें जाण ।
दृश्या वेगळी खूण । गगनासारिखी ॥ ३५ ॥
कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें ।
जैसें न दिसें आपुलें । आपणासि धन ॥ ३६ ॥
जो जो पदार्थ दृष्टीस पडे । तें त्या पदार्था ऐलिकडे ।
अनुभवे हें कुवाडें । उकलावें ॥ ३७ ॥
मागें पुढें आकाश । पदार्थेंविण जो पैस ।
पृथ्वीविण भकास । येकरूप ॥ ३८ ॥
जें जें रूप आणि नाम । तो तो नाथिलाचि भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणती ॥ ३९ ॥
नभीं धूम्राचे डोंगर । उचलती थोर थोर ।
तैसें दावी वोडंबर । मायादेवी ॥ ४० ॥
ऐसी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत ।
सर्वांठायीं सदोदित । भरलें असे ॥ ४१ ॥
पोथी वाचूं जातां पाहे । मातृकामधेंचि आहे ।
नेत्रीं निघोनि राहे । मृदपणें ॥ ४२ ॥
श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहातां ।
मना सबाह्य तत्वतां । परब्रह्म तें ॥ ४३ ॥
चरणीं चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं ।
करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ॥ ४४ ॥
असो इंद्रियसमुदाव । तयामध्यें वर्ते सर्व ।
जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ॥ ४५ ॥
जें जवळीच असे । पांहों जातां न दिसे ।
न दिसोन वसे । कांहीं येक ॥ ४६ ॥
जें अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनि अभावें ।
आपुलेनि स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ॥ ४७ ॥
ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे ।
अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष ॥ ४८ ॥
जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।
ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ ४९ ॥
साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण ।
जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ॥ ५० ॥
जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंही नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ॥ ५१ ॥
ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत ।
योगिजना येकांत । अनुभवें जाणावा ॥ ५२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
विमलब्रह्मनिरूपणनाम सामास चौथा ॥ ४ ॥ ७.४

समास पांचवा : द्वैतकल्पनानिरसन

॥ श्रीराम ॥

केवळब्रह्म जें बोलिलें । तें अनुभवास आलें ।
आणि मायेचेंहि लागलें । अनुसंधान ॥ १ ॥
ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणी मायाही प्रत्यक्ष दिसे ।
आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी हो ॥ २ ॥
तरी आतां सावधान । येकाग्र करूनियां मन ।
मायाब्रह्म हें कवण । जाणताहे ॥ ३ ॥
सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प ।
ऐशिया द्वैताचा जल्प । मनचि करी ॥ ४ ॥
जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ।
सर्व जाणे म्हणोनियां । सर्वसाक्षिणी ॥ ५ ॥
ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण ।
सर्वचि नाहीं कवण । जाणेल गा ॥ ६ ॥
संकल्पविकल्पाची सृष्टी । जाली मनाचियें पोटीं ।
तें मनचि मिथ्या शेवटीं । साक्षी कवणु ॥ ७ ॥
साक्षत्व चैतन्यत्वसत्ता । हे गुण ब्रह्माचिया माथां ।
आरोपले जाण वृथा । मायागुणें ॥ ८ ॥
घटामठाचेनि गुणें । त्रिविधा आकाश हें बोलणें ।
मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं ॥ ९ ॥
जंव खरेपण मायेसी । तंवचि साक्षित्व ब्रह्मासी ।
मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैंचें ॥ १० ॥
म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन ।
मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ॥ ११ ॥
जयास द्वैत भासलें । तें मन उन्मन जालें ।
द्वैताअद्वैतांचें तुटलें । अनुसंधान ॥ १२ ॥
एवं द्वैत आणि अद्वैत । होये वृत्तीचा संकेत ।
वृत्ति जालिया निवृत्त । द्वैत कैंचें ॥ १३ ॥
वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मींचें ॥ १४ ॥
मायाब्रह्म ऐसा हेत । मनें कल्पिला संकेत ।
ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥
जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर ।
तें अनुभवितां साचार । द्वैत कैंचें ॥ १६ ॥
द्वैत पाहातां ब्रह्म नसे । ब्रह्म पाहातां द्वैत नासे ।
द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ॥ १७ ॥
कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थावरी ।

संशय धरी आणि वारी । तेही कल्पना ॥ १८ ॥
कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान ।
ब्रह्मीं लावी अनुसंधान । तेही कल्पना ॥ १९ ॥
कल्पना द्वैताची माता । कल्पनाचि ज्ञप्ति तत्वता ।
बद्धता आणि मुक्तता । कल्पनागुणें ॥ २० ॥
कल्पना अंतरीं सबळ । नसते दावी ब्रह्मगोळ ।
क्षणा येक ते निर्मळ । स्वरूप कल्पी ॥ २१ ॥
क्षणा येक धोका वाहे । क्षणा येक स्थिर राहे ।
क्षणा येक पाहे । विस्मित होउनी ॥ २२ ॥
क्षणा येकांत उमजे । क्षणा येकातें निर्बुजे ।
नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ॥ २३ ॥
कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ ।
कल्पना तेचि केवळ । मोक्षदात्री ॥ २४ ॥
असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना ।
येऱ्हवीं हे पतना । मूळच कीं ॥ २५ ॥
म्हणोनि सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाचि केवळ ।
इचें केलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ॥ २६ ॥
श्रवण आणि मनन । निजध्यासें समाधान ।
मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाये ॥ २७ ॥
शुद्ध ब्रह्माचा निश्चय । करी कल्पनेचा जय ।
निश्चितार्थें संशय । तुटोन गेला ॥ २८ ॥
मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें ।
जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ॥ २९ ॥
तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे ।
मग हें तुटे आपैसें । द्वैतानुसंधान ॥ ३० ॥
कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे ।
कां शरें शर आतुडे । आकाशमार्गी ॥ ३१ ॥
शुद्ध कल्पनेचें बळ । जालिया नासे शबल ।
हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ॥ ३२ ॥
शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण ।
स्वस्वरूपीं विस्मरण । पडोंचि नेदी ॥ ३३ ॥
सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निरसन ।
अद्वैतनिश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ॥ ३४ ॥
अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।
अशुद्ध तेंचि प्रसिद्ध । शबल जाणावें ॥ ३५ ॥
शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ ।
आणि शबल ते व्यर्थ । द्वैत कल्पी ॥ ३६ ॥
अद्वैतकल्पना प्रकाशे । तेच क्षणीं द्वैत नासे ।
द्वैतासरिसी निरसे । शबलकल्पना ॥ ३७ ॥
कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें ।
सबळ गेलियां नंतरें । शुद्ध उरली ॥ ३८ ॥
शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि हें कल्पी स्वरूप ।
स्वरूप कल्पितां तद्रूप । होये आपण ॥ ३९ ॥
कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहजचि तद्रूप जालें ।
आत्मनिश्चयें नाशिलें । कल्पनेसी ॥ ४० ॥
जेचि क्षणीं निश्चय चळे । तेचि क्षणीं द्वैत उफाळे ।
जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ॥ ४१ ॥
तैसें ज्ञान होतां मलिन । अज्ञान प्रबळे जाण ।
याकारणें श्रवण । अखंड असावें ॥ ४२ ॥
आतां असो हें बोलणें जालें । आशंका फेडूं येका बोलें ।
जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ॥ ४३ ॥
मागील आशंका फिटली । इतुकेन ही कथा संपली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ४४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
द्वैतकल्पनानिरसननिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ ७.५

समास सहावा : बद्धमुक्तनिरूपण
॥ श्रीराम ॥
अद्वैतब्रह्म निरूपिलें । जें कल्पनेरहित संचलें ।
क्षणएक तदाकार केलें । मज या निरूपणें ॥ १ ॥
परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि होऊन असावें ।
पुनः संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ॥ २ ॥
कल्पनारहित जें सुख । तेथें नाहीं संसारदुःख ।
म्हणोनि तेंचि येक । होऊन असावें ॥ ३ ॥
ब्रह्मचि होइजे श्रवणें । पुन्हां वृत्तिवरी लागे येणें ।
ऐसें सदा येणें जाणें । चुकेना कीं ॥ ४ ॥
मनें अंतरिक्षीं जावें । क्षणएक ब्रह्मचि व्हावें ।
पुन्हां तेथून कोसळावें । वृत्तिवरी मागुती ॥ ५ ॥
प्रत्यावृत्ति सैरावैरा । किती करूं येरझारा ।
पायीं लावूनियां दोरा । कीटक जैसा ॥ ६ ॥
उपदेशकाळीं तदाकार । होतां पडे हें शरीर ।
अथवा नेणें आपपर । ऐसें जालें पाहिजे ॥ ७ ॥
ऐसें नसतां जें बोलणें । तेंचि वाटे लाजिरवाणें ।
ब्रह्म होऊन संसार करणें । हेंही विपरीत दिसे ॥ ८ ॥
जो स्वयें ब्रह्मचि जाला । तो मागुता कैसा आला ।
ऐसें ज्ञान माझें मजला । प्रशस्त न वाटे ॥ ९ ॥
ब्रह्मचि होऊन जावें । कां तें संसारीच असावें ।
दोहींकडे भरंगळावें । किती म्हणोनि ॥ १० ॥
निरूपणीं ज्ञान प्रबळे । उठोन जातां तें मावळे ।
मागुता काम क्रोध खवळे । ब्रह्मरूपासी ॥ ११ ॥
ऐसा कैसा ब्रह्म जाला । दोहींकडे अंतरला ।
वोडगस्तपणेंचि गेला । संसार त्याचा ॥ १२ ॥
घेतां ब्रह्मसुखाची गोडी । संसारिक मागें वोढी ।
संसार करितां आवडी । ब्रह्मीं उपजे मागुती ॥ १३ ॥
ब्रह्मसुख नेलें संसारें । संसार गेला ज्ञानद्वारें ।
दोहीं अपुरीं पुरें । येकही नाहीं ॥ १४ ॥
याकारणें माझें चित्त । चंचळ जालें दुश्चित ।

काय करणें निश्चितार्थ । येकही नाहीं ॥ १५ ॥
ऐसा श्रोता करी विनंती । आतां रहावें कोणे रीतीं ।
म्हणे अखंड माझी मती । ब्रह्माकार नाहीं ॥ १६ ॥
आतां याचें प्रत्योत्तर । वक्ता देईल सुंदर ।
श्रोतीं व्हावें निरुत्तर । क्षण येक आतां ॥ १७ ॥
ब्रह्मचि होऊन जे पडले । तेचि मुक्तिपदास गेले ।
येर ते काय बुडाले । व्यासादिक ॥ १८ ॥
श्रोता विनंती करी पुढती । शुक मुक्तो वामदेवो वा हे श्रुती ।
दोघेचि मुक्त आदिअंतीं । बोलत असे ॥ १९ ॥
वेदें बद्ध केले सर्व । मुक्त शुक वामदेव ।
वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ॥ २० ॥
ऐसा श्रोता वेदाधारें । देता जाला प्रत्योत्तरें ।
दोघेचि मुक्त अत्यादरें । प्रतिपाद्य केले ॥ २१ ॥
वक्ता बोले याउपरी । दोघेचि मुक्त सृष्टीवरी ।
ऐसें बोलतां उरी । कोणास आहे ॥ २२ ॥
बहु ऋषि बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी ।
जाले पुरुष समाधानी । असंख्यात ॥ २३ ॥
प्रऱ्हादनारदपराशरपुंडरीक-
व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठविभीषणादीन्
पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १ ॥
कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।
आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २ ॥
यांहीविगळे थोर थोर । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
आदिकरून दिगंबर । विदेहादिक ॥ २४ ॥
शुक वामदेव मुक्त जाले । येर हे अवघेच बुडाले ।
या वचनें विश्वासले । ते पढतमूर्ख ॥ २५ ॥
तरी वेद कैसा बोलिला । तो काय तुम्हीं मिथ्या केला ।
ऐकोन वक्ता देता जाला । प्रत्योत्तर ॥ २६ ॥
वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष ।
साधु आणि व्युत्पन्न दक्ष । त्यांस हें न माने ॥ २७ ॥
तथापि हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें ।
वेदाचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ॥ २८ ॥
वेदाअंगीं सामर्थ्य नसे । तरी या वेदासि कोण पुसे ।
म्हणोनि वेदीं सामर्थ्य असे । जन उद्धरावया ॥ २९ ॥
वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यराशी ।
म्हणोनि वेदीं सामर्थ्यासी । काय उणें ॥ ३० ॥
वेद शास्त्र पुराण । भाग्यें जालिया श्रवण ।
तेणें होइजे पावन । हें बोलती साधु ॥ ३१ ॥
श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद ।
श्रवण होतां येक शब्द । नाना दोष जाती ॥ ३२ ॥
वेद शास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्यांच्या आयणी ।
अगाध महिमा व्यासवाणी । वदोनि गेली ॥ ३३ ॥
येकाक्षर होतां श्रवण । तात्काळचि होइजे पावन ।
ऐसें ग्रंथाचें महिमान । ठायीं ठायीं बोलिलें ॥ ३४ ॥
दोहींविगळा तिजा नुद्धरे । तरी महिमा कैंचा उरे ।
असो हें जाणिजे चतुरें । येरां गाथागोवी ॥ ३५ ॥
वेद शास्त्रें पुराणें । कैसीं होती अप्रमाणें ।
दोघावांचूनि तिसरा कोणें । उद्धरावा ॥ ३६ ॥
म्हणसी काष्ठीं लागोन पडला । तोचि येक मुक्त जाला ।
शुक तोही अनुवादला । नाना निरूपणें ॥ ३७ ॥
शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण ।
परी तो नव्हता अचेतन । ब्रह्माकार ॥ ३८ ॥
अचेतन ब्रह्माकार । असता शुक योगीश्वर ।
तरी सारासार विचार । बोलणें न घडे ॥ ३९ ॥
जो ब्रह्माकार जाला । तो काष्ठ होऊन पडिला ।
शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ॥ ४० ॥
निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार ।
धांडोळावें सचराचर । दृष्टांताकारणें ॥ ४१ ॥
क्षण येक ब्रह्मचि व्हावें । क्षण येक दृश्य धांडोळावें ।
नाना दृष्टांतीं संपादावें । वक्तृत्वासी ॥ ४२ ॥
असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण ।
तया अंगीं बद्धपण । लावूं नये कीं ॥ ४३ ॥
म्हणोनि बोलतां चालतां । निचेष्टित पडिलें नसतां ।
मुक्ति लाभे सायुज्यता । सद्‌गुरुबोधें ॥ ४४ ॥
येक मुक्त येक नित्यमुक्त । येक जाणावे जीवन्मुक्त ।
येक योगी विदेहमुक्त । समाधानी ॥ ४५ ॥
सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त ।
दोहीविगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे ॥ ४६ ॥
स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी तटस्थता ।
तटस्थता आणि स्तब्धता । हा देहसंबंध ॥ ४७ ॥
येथें अनुभवासीच कारण । येर सर्व निष्कारण ।
तृप्ति पावावी आपण । आपुल्या स्वानुभवें ॥ ४८ ॥
कंठमर्याद जेविला । त्यास म्हणती भुकेला ।
तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना ॥ ४९ ॥
स्वरूपीं नाहीं देह । तेथें कायसा संदेह ।
बद्ध मुक्त ऐसा भाव । देहाचकडे ॥ ५० ॥
देहबुद्धी धरून चिंती । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती ।
तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची ॥ ५१ ॥
मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध ।
स्वस्वरूप स्वतःसिद्ध । बद्ध ना मुक्त ॥ ५२ ॥
मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाइजे पाताळा ।
देहबुद्धीची आगळा । स्वरूपीं न संटे ॥ ५३ ॥
मीपणापासून सुटला । तोचि येक मुक्त जाहला ।
मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ॥ ५४ ॥
जयास बांधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव ।

पाहों जातां सकळ वाव । गुणवार्ता ॥ ५५॥
बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो न मे वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥ १॥
तत्वज्ञाता परमशुद्ध । तयासि नाहीं मुक्त बद्ध ।
मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें ॥ ५६॥
जेथें नाम रूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे ।
मुक्त बद्ध हें विसरे । विसरपणेंसीं ॥ ५७॥
बद्ध मुक्त जाला कोण । तो तरी नव्हे कीं आपण ।
बाधक जाणावें मीपण । धर्त्यास बाधी ॥ ५८॥
एवं हा अवघा भ्रम । अहंतेचा जाला श्रम ।
मायातीत जो विश्राम । सेविला नाहीं ॥ ५९॥
असो बद्धता आणि मुक्तता । आली कल्पनेच्या माथां ।
ते कल्पना तरी तत्वतां । साच आहे ॥ ६०॥
म्हणोनि हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ ।
स्वप्न मिथ्या तात्काळ । जागृतीस होये ॥ ६१॥
स्वप्नीं बद्ध मुक्त जाला । तो जागृतीस नाहीं आला ।
कैंचा कोण काय जाला । कांहीं कळेना ॥ ६२॥
म्हणोन मुक्त विश्वजन । जयांस जालें आत्मज्ञान ।
शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वाव ॥ ६३॥
बद्ध मुक्त हा संदेह । धरी कल्पनेचा देह ।
साधु सदा निःसंदेह । देहातीत वस्तु ॥ ६४॥
आतां असो हें पुढती । पुढें रहावें कोणें रीतीं ।
तेंचि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ॥ ६५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
बद्धमुक्तनिरूपणनाम समास सहावा ॥ ६॥ ७.६

जय जय रघुवीर समर्थ ॥
समास सातवा : साधनप्रतिष्ठानिरूपण
॥ श्रीराम ॥
वस्तूसि जरी कल्पावें । तरी ते निर्विकल्प स्वभावें ।
तेथें कल्पनेच्या नावें । शून्याकार ॥ १॥
तथापि कल्पूं जातां । न ये कल्पनेच्या हाता ।
ओळखी ठायीं न पडे चित्ता । भ्रंश पडे ॥ २॥
कांहीं दृष्टीस न दिसे । मनास तेही न भासे ।
न भासे न दिसे । कैसें वोळखावें ॥ ३॥
पाहों जातां निराकार । मनासि पडे शून्याकार ।
कल्पूं जातां अंधकार । भरला वाटे ॥ ४॥
कल्पूं जातां वाटे काळें । ब्रह्म काळें ना पिंवळें ।
आरक्त निळें ना धवळें । वर्णरहित ॥ ५॥
जयास वर्णव्यक्ति नसे । भासाहूनि अनारिसें ।
रूपचि नाहीं कैसें । वोळखावें ॥ ६॥
न दिसतां वोळखण । किती धरावी आपण ।
हें तों श्रमासीच कारण । होत असे ॥ ७॥
जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अव्यक्त ।
जो अचिंत्य चिंतनातीत । परमपुरुष ॥ ८॥
॥ श्लोक ॥
अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने ।
समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः ॥ १॥

अचिंत्य तें चिंतावें । अव्यक्तास आठवावें ।
निर्गुणास वोळखावें । कोणेपरी ॥ ९॥
जें दृष्टीसचि न पडे । जें मनासही नातुडे ।
तया कैसें पाहाणें घडे । निर्गुणासी ॥ १०॥
असंगाचा संग धरणें । निरवलंबीं वास करणें ।
निशब्दासी अनुवादणें । कोणेपरी ॥ ११॥
अचिंत्यासि चिंतूं जातां । निर्विकल्पासि कल्पितां ।
अद्वैताचें ध्यान करितां । द्वैतचि उठे ॥ १२॥
आतां ध्यानचि सांडावें । अनुसंधान तें मोडावें ।
तरी मागुतें पडावें । महासंशयीं ॥ १३॥
द्वैताच्या भेणें अंतरीं । वस्तु न पाहिजे तरी ।
तेणें समाधाना उरी । कदा असेचिना ॥ १४॥
सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे ।
नित्यानित्यविचारें घडे । समाधान ॥ १५॥
वस्तु चिंतितां द्वैत उपजे । सोडी करितां कांहींच नुमजे ।
शून्यत्वें संदेहीं पडिजे । विवेकेंविण ॥ १६॥
म्हणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सारावा ।
अहंभाव ओसरावा । परी तो ओसरेना ॥ १७॥
परब्रह्म तें अद्वैत । कल्पितांच उठे द्वैत ।
तेथें हेतु आणि दृष्टांत । कांहींच न चले ॥ १८॥
तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोन आठविजे ।
जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ॥ १९॥
त्यास न भेटतां होय भेटी । भेटों जातां पडे तुटी ।
ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ २०॥
तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना ।
लागला संबंध तुटेना । निरंतर ॥ २१॥
तें असतचि सदा असे । नातरी पाहातां दुराशे ।
न पाहातां प्रकाशे । जेथें तेथें ॥ २२॥
जेथें उपाये तेथें अपाये । आणी अपाये तोचि उपाये ।
हें अनुभवेंविण काये । उमजों जाणें ॥ २३॥
तें नुमजतांचि उमजे । उमजोन कांहींच नुमजे ।
तें वृत्तिविण पाविजे । निवृत्तिपद ॥ २४॥
तें ध्यानीं धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये ।
मनामध्यें न समाये । परब्रह्म तें ॥ २५॥
त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ ।
विश्व बुडालें सकळ । परी तें कोरडेंचि असे ॥ २६॥
नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें ।
आतां तें कासयासारिखें । सांगावें हो ॥ २७॥

ऐसें ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान ।
लावावें तें अनुसंधान । कोणे परी ॥ २८ ॥
अनुसंधान लावूं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां ।
तेणे मनाचिये माथां । संदेह वाजे ॥ २९ ॥
लटिकेंचि काय पहावें । कोठें जाऊन रहावें ।
अभाव घेतला जीवें । सत्यस्वरूपाचा ॥ ३० ॥
अभावचि म्हणों सत्य । तरी वेद शास्त्रें कैसें मिथ्य ।
आणि व्यासादिकांचें कृत्य । वाउगें नव्हे ॥ ३१ ॥
म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । बहुत ज्ञानाचे उपाय ।
बहुतीं निर्मिलीं तें काय । मिथ्या म्हणावें ॥ ३२ ॥
अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश ।
सांगतां होय पार्वतीस । पार्वतीप्रती ॥ ३३ ॥
अवधूत गीता केली । गोरक्षास निरूपिली ।
ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ॥ ३४ ॥
विष्णु होऊन राजहंस । विधीस केला उपदेश ।
ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ॥ ३५ ॥
ब्रह्मा नारदातें उपदेशित । चतुःश्लोकी भागवत ।
पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ॥ ३६ ॥
वासिष्ठसार वसिष्ठ ऋषी । सांगता जाला रघुनाथासी ।
कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ॥ ३७ ॥
ऐसें सांगावें तें किती । बहुत ऋषि बोलिले बहुतीं ।
अद्वैतज्ञान आदि अंतीं । सत्यचि असे ॥ ३८ ॥
म्हणोन मिथ्या आत्मज्ञान । म्हणतां पाविजे पतन ।
प्रज्ञेरहित ते जन । तयांस हें कळेना ॥ ३९ ॥
जेथें शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौनमुद्रा पडिली ।
जाणपणें न वचे वदली । स्वरूपस्थिती ॥ ४० ॥
आपणास नुमजे बरवें । म्हणोनि मिथ्या कैसें करावें ।
नातरी सुदृढ धरावें । सद्गुरुमुखें ॥ ४१ ॥
मिथ्या तेंचि सत्य जालें । सत्य असोनि मिथ्या केलें ।
संदेहसागरीं बुडालें । अकस्मात मन ॥ ४२ ॥
मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिलें तें नव्हे ।
तेणें गुणें संदेह धांवे । मीपणाचेनि पंथें ॥ ४३ ॥
तरी तो पंथचि मोडावा । मग परमात्मा जोडावा ।
समूळ संदेह तोडावा । साधूचेनि संगतीं ॥ ४४ ॥
मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना ।
मीपण सोडितां सुटेना । कांहीं केल्या ॥ ४५ ॥
मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे ।
मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ॥ ४६ ॥
मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे ।
मीपणें सकळही उडे । यश कीर्ति प्रताप ॥ ४७ ॥
मीपणें मैत्री तुटे । मीपणें प्रीति आटे ।
मीपणें लिगटे । अभिमान अंगीं ॥ ४८ ॥
मीपणें विकल्प उठे । मीपणें कलह सुटे ।
मीपणें संमोह फुटे । ऐक्यतेचा ॥ ४९ ॥
मीपण कोणासीच न साहे । तें भगवंतीं कैसेनि साहे ।
म्हणून मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ॥ ५० ॥
मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें ।
समाधान कैसें पावावें । कोणा प्रकारें ॥ ५१ ॥
मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें ।
समाधान तें पावावें । निःसंगपणे ॥ ५२ ॥
आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन ।
करूं जाणे तोचि धन्य । समाधानी ॥ ५३ ॥
मी ब्रह्मचि जालों स्वतां । साधन करील कोण आतां ।
ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ॥ ५४ ॥
ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे ।
तयेसी शोधूनि पाहे । तोचि साधु ॥ ५५ ॥
निर्विकल्पासि कल्पावें । परी कल्पिलें तें आपण न व्हावें ।
मीपणास त्यागावें । येणें रीतीं ॥ ५६ ॥
ब्रह्मविद्येच्या लपणीं । कांहींच नसावें असोनी ।
दक्ष आणि समाधानी । तोचि हें जाणें ॥ ५७ ॥
जयास आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें ।
येथें कल्पनेच्या नांवें । शून्य आलें ॥ ५८ ॥
पदींहून चळों नये । करावे साधनउपाये ।
तरीच सांपडे सोये । अलिप्तपणाची ॥ ५९ ॥
राजा राजपदीं असतां । उगीच चाले सर्व सत्ता ।
साध्यचि होऊन तत्वतां । साधन करावें ॥ ६० ॥
साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा ।
ऐसा करून अकर्ता । सहजचि आहे ॥ ६१ ॥
देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें ।
देहातीत असतां स्वभावें । देह कैंचा ॥ ६२ ॥
ना तें साधन ना तें देह । आपण आपला निःसंदेह ।
देहींच असोन विदेह । स्थिति ऐसी ॥ ६३ ॥
साधनेंविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता ।
आळस प्रबळे तत्वतां । ब्रह्मज्ञानमिसें ॥ ६४ ॥
परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे ।
मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता ॥ ६५ ॥
निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें वेवाद पडे ।
उपाधिमिसें येऊन जडे । अभिमान अंगीं ॥ ६६ ॥
तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे ।
म्हणे साधनाचें पिसें । काय करावें ॥ ६७ ॥
किं करोमि क्व गच्छामि किं गृह्णामि त्यजामि किम् ।
आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥ १ ॥
वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिरविलें ।
स्वतां हाणोनि घेतलें । जयापरी ॥ ६८ ॥
तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये ।
साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ॥ ६९ ॥

साधन करितांच सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।
तेणेंगुणें साधन । करूंच नावडे ॥ ७० ॥
लोक म्हणती हा साधक । हेचि लज्जा वाटे येक ।
साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥ ७१ ॥
आतां असो हे अविद्या । अभ्याससारिणी विद्या ।
अभ्यासें पाविजे आद्या । पूर्ण ब्रह्म ॥ ७२ ॥
अभ्यास करावा कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।
परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ॥ ७३ ॥
याचें उत्तर श्रोतयासी । दिधलें पुढियलें समासीं ।
निरूपिलें साधनासी । परमार्थाच्या ॥ ७४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
साधनप्रतिष्ठानिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ ७.७

समास आठवा : श्रवणनिरूपण
॥ श्रीराम ॥
ऐक परमार्थाचें साधन । जेणें होय समाधान ।
तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं ॥ १ ॥
श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती ।
श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ २ ॥
श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होय दृढ बुद्धी ।
श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची ॥ ३ ॥
श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे ।
श्रवणें अंतरीं जोडे । समाधान ॥ ४ ॥
श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशयो तुटे ।
श्रवण होतां पालटे । पूर्वगुण आपुला ॥ ५ ॥
श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान ।
श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ॥ ६ ॥
श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका न ये ।
श्रवणें नाना अपाये । भस्म होती ॥ ७ ॥
श्रवणें होय कार्यसिद्धि । श्रवणें लागे समाधी ।
श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी ॥ ८ ॥var साधनांची
सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होईजे आपण । तदाकार ॥ ९ ॥
श्रवणें प्रबोध वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे ।
श्रवणें विषयांचे वोढे । तुटोन जाती ॥ १० ॥
श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे ।
श्रवणें वस्तु निवळे । साधकांसी ॥ ११ ॥
श्रवणें सद्बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे ।
श्रवणें मन हें मागे । भगवंतासी ॥ १२ ॥
श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम ओहटे ।
श्रवणें धोका आटे । येकसरां ॥ १३ ॥
श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।
श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४ ॥
श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती ।
श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळपद ॥ १५ ॥
श्रवणा-ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं ।
भवनदीच्या प्रवाहीं । तरणोपाय श्रवणें ॥ १६ ॥
श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वी सर्वारंभ ।
श्रवणें होय स्वयंभ । सर्व कांहीं ॥ १७ ॥
प्रवृत्ति अथवा निवृत्ति । श्रवणेंविण न घडे प्राप्ती ।
हे तों सकळांस प्रचीती । प्रत्यक्ष आहे ॥ १८ ॥
ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जनां ।
त्याकारणें मूळ प्रयत्ना । श्रवण आधीं ॥ १९ ॥
जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं ।
म्हणोनिया दुजें कांहीं । साम्यता न घडे ॥ २० ॥
बहुत साधनें पाहातां । श्रवणास न घडे साम्यता ।
श्रवणेंविण तत्वता । कार्य न चले ॥ २१ ॥
न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार ।
श्रवणेंविण प्रकार । तैसा होये ॥ २२ ॥
कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती ।
कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ॥ २३ ॥
न कळे षट्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण ।
न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४ ॥
नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें ।
नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ॥ २५ ॥
नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्वांचें शोधन ।
नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ॥ २६ ॥
अठरा भार वनस्पती । येका जळें प्रबळती ।
येका रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ॥ २७ ॥
सकळ जीवांस येक पृथ्वी । सकळ जीवांस येक रवी ।
सकळ जीवांस वर्तवी । येक वायु ॥ २८ ॥
सकळ जीवांस येक पैस । जयास बोलिजे आकाश ।
सकळ जीवांचा वास । येक परब्रह्मीं ॥ २९ ॥
तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन ।
तें हें जाण श्रवण । प्राणिमात्रांसीं ॥ ३० ॥
नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
सर्वांस श्रवणापरतें । साधनचि नाहीं ॥ ३१ ॥
श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्षु होती ।
मुमुक्षूचे साधक अती । नेमेंसिं चालती ॥ ३२ ॥
साधकांचे होति सिद्ध । अंगीं बाणतां प्रबोध ।
हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउकें ॥ ३३ ॥
ठायींचे खळ चांडाळ । तेचि होती पुण्यशीळ ।
ऐसा गुण तात्काळ । श्रवणाचा ॥ ३४ ॥
जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होय पुण्यात्मा ।
अगाध श्रवणाचा महिमा । बोलिला न वचे ॥ ३५ ॥
तीर्थव्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती ।
तैसें नव्हे हातींच्या हातीं । सप्रचीत श्रवणें ॥ ३६ ॥

नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी ।
तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ॥ ३७ ॥
श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रगटे बळें ।
मुख्य परमात्मा आकळे । स्वानुभवासी ॥ ३८ ॥
या नांव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान ।
निदिध्यासें समाधान । होत असे ॥ ३९ ॥
बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे ।
अकस्मात अंतरीं वोळे । निःसंदेह ॥ ४० ॥
संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होय निर्मूळ ।
पुढें सहजचि प्रांजळ । समाधान ॥ ४१ ॥
जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैंचें समाधान ।
मुक्तपणाचें बंधन । जडलें पायीं ॥ ४२ ॥
मुमुक्षु साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो अबद्ध ।
श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होये ॥ ४३ ॥
जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण ।
तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ॥ ४४ ॥
जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ ।
मागें केलें तितुकें व्यर्थ । श्रवणेंविण होये ॥ ४५ ॥
तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें ।
नित्य नेमें तरावें । संसारसागरीं ॥ ४६ ॥
सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥ ४७ ॥
श्रवणाचा अनादर । आळस करी जो नर ।
त्याचा होय अपहार । स्वहिताविषयीं ॥ ४८ ॥
आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण ।
याकारणें श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ४९ ॥
आतां श्रवण कैसें करावें । कोण्या ग्रंथास पाहावें ।
पुढिलिये समासीं आघवें । सांगिजेल ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
श्रवणनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ ७.८

समास नववा : श्रवणनिरूपण

॥ श्रीराम ॥

आतां श्रवण कैसें करावें । तेंही सांगिजेल अघवें ।
श्रोतीं अवधान द्यावें । येकचित्तें ॥ १ ॥
येक वक्तृत्व श्रवणीं पडे । तेणें जालें समाधान मोडे ।
केला निश्चयो विघडे । अकस्मात ॥ २ ॥
तें वक्तृत्व त्यागावें । जें माईक स्वभावें ।
तेथें निश्चयाच्या नांवें । शून्याकार ॥ ३ ॥
येका ग्रंथें निश्चयो केला । तो दुजयानें उडविला ।
तेणें संशयचि वाढला । जन्मवरी ॥ ४ ॥
जेथें संशय तुटती । होय आशंकानिवृत्ती ।
अद्वैतग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ॥ ५ ॥
जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी ।
प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची ॥ ६ ॥
जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक ।
तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ॥ ७ ॥
जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत ।
तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयांचें ॥ ८ ॥
आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे ।
नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां ॥ ९ ॥
ज्याची उपासना जैसी । त्यासि प्रीति वाढे तैसी ।
तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वाटे ॥ १० ॥
प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें ।
पाणी पाणवाटें जैसें । आपणचि धांवे ॥ ११ ॥
तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर ।
तेथें पाहिजे सारासार- । विचारणा ते ॥ १२ ॥
जेथें कुळदेवी भगवती । तेथें पाहिजे सप्तशती ।
इतर देवांची स्तुती । कामा न ये सर्वथा ॥ १३ ॥
घेतां अनंताच्या व्रता । तेथें नलगे भगवद्गीता ।
साधुजनांसि वार्ता । फळाशेचि नाहीं ॥ १४ ॥
वीरकंकण घालितां नाकीं । परी तें शोभा पावेना कीं ।
जेथील तेथें आणिकीं । कामा न ये सर्वथा ॥ १५ ॥
नाना माहात्में बोलिलीं । जेथील तेथें वंद्य जालीं ।
विपरीत करून वाचिलीं । तरी तें विलक्षण ॥ १६ ॥
मल्हारीमाहात्म्य द्वारकेसी । द्वारकामाहात्म्य नेलें काशीसी ।
काशीमाहात्म्य वेंकटसीं । शोभा न पावे ॥ १७ ॥
ऐसें सांगतां असे वाड । परी जेथील तेथेंचि गोड ।
तैसी ज्ञानियांस चाड । अद्वैतग्रंथाची ॥ १८ ॥
योगियांपुढे राहाण । परीक्षावंतापुढें पाषाण ।
पंडितापुढें डफगाण । शोभा न पावे ॥ १९ ॥
वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढें फळश्रुति ।
ज्ञानियापुढें पोथी । कोकशास्त्राच्ची ॥ २० ॥
ब्रह्मचर्यापुढें नाचणी । रासक्रीडा निरूपणीं ।
राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ॥ २१ ॥
तैसें अंतर्निष्ठापुढें । ठेविलें शृंगारी टीपडें ।
तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ॥ २२ ॥
रायास रंकाची आशा । तक्र सांगणें पीयूषा ।
संन्याशास वोवसा । उच्छिष्टचांडाळीचा ॥ २३ ॥
कर्मनिष्ठा वशीकरण । पंचाक्षरीया निरूपण ।
तेथें भंगे अंतःकरण । सहजचि त्याचें ॥ २४ ॥
तैसे पारमार्थिक जन । तयांस नसतां आत्मज्ञान ।
ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ॥ २५ ॥
आतां असो हें बोलणें । जयास स्वहित करणें ।
तेणें सदा विवरणें । अद्वैतग्रंथीं ॥ २६ ॥
आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहाणें अद्वैत ।
येकांत स्थळीं निवांत । समाधान ॥ २७ ॥

बहुत प्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता ।
परमार्थास तत्वतां । तारूंच कीं ॥ २८ ॥
इतर जे प्रापंचिक । हास्य विनोद नवरसिक ।
हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ २९ ॥
जेणें परमार्थ वाढे । अंगीं अनुताप चढे ।
भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३० ॥
जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे ।
नातरी येकसरी वोळे । मन भगवंतीं ॥ ३१ ॥
जेणें होय उपरती । अवगुण अवघे पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥ ३२ ॥
जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३३ ॥
जेणें ग्रंथ परत्र साधन । जेणें ग्रंथें होये ज्ञान ।
जेणें होइजे पावन । त्या नांव ग्रंथ ॥ ३४ ॥
ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती ।
जेथें नुपजे विरक्ती भक्ति । तो ग्रंथचि नव्हे ॥ ३५ ॥
मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी ।
ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाच वाढे ॥ ३६ ॥
श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें ।
बैसलीं दुराशेचीं भूतें । तयां अधोगती ॥ ३७ ॥
ऐकोनीच फळश्रुती । पुढें तरी पावों म्हणती ।
तयां जन्म अधोगती । सहजचि जाहली ॥ ३८ ॥
नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होय तृप्ती ।
परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ॥ ३९ ॥
तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास ।
परी जे भगवंताचे अंश । ते भगवंत इच्छिती ॥ ४० ॥
ज्ञानियास पाहिजे ज्ञान । भजकास पाहिजे भजन ।
साधकास पाहिजे साधन । इछेसारिखें ॥ ४१ ॥
परमार्थ्यास पाहिजे परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ ।
कृपणास पाहिजे अर्थ । मनापासूनी ॥ ४२ ॥
योगियास पाहिजे योग । भोगियास पाहिजे भोग ।
रोगियास पाहिजे रोग- । हरती मात्रा ॥ ४३ ॥ var हर्ति
कवीस पाहिजे प्रबंध । तार्किकास पाहिजे तर्कवाद ।
भाविकास संवाद । गोड वाटे ॥ ४४ ॥
पंडितास पाहिजे व्युत्पत्ती । विद्वानास अध्ययनप्रीती ।
कलावंतास आवडती । नाना कळा ॥ ४५ ॥
हरिदासांस आवडे कीर्तन । शुचिर्भूतांस संध्यास्नान ।
कर्मनिष्ठांस विधिविधान । पाहिजे तें ॥ ४६ ॥
प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा ।
चातुर्य पाहे शहाणा । आदरेंसीं ॥ ४७ ॥
भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत पाहे तालज्ञान ।
रागज्ञानी तानमान । मूर्च्छना पाहे ॥ ४८ ॥
योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्वज्ञानी तत्वज्ञान ।
नाडीज्ञानी मात्राज्ञान । पाहातुसे ॥ ४९ ॥
कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकीमंत्र ।
यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसी ॥ ५० ॥
टवाळासि आवडे विनोद । उन्मतास नाना छंद ।
तामसास प्रमाद । गोड वाटे ॥ ५१ ॥
मूर्ख होय नादलुब्धी । निंदक पाहे उणी संधी ।
पापी पाहे पापबुद्धी । लावून अंगीं ॥ ५२ ॥
येकां पाहिजे रसाळ । येकां पाहिजे पाल्हाळ ।
येकां पाहिजे केवळ । साबडी भक्ती ॥ ५३ ॥
आगमी पाहे आगम । शूर पाहे संग्राम ।
येक पाहाती नाना धर्म । इच्छेसारिखे ॥ ५४ ॥
मुक्त पाहे मुक्तलीला । सर्वज्ञ पाहे सर्वज्ञकळा ।
ज्योतिषी भविष्य पिंगळा । वर्णूं पाहे ॥ ५५ ॥
ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती ।
नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६ ॥
परी परत्रसाधनेंविण । म्हणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव करमणूक ॥ ५७ ॥
गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण ।
ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ॥ ५८ ॥
आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थ ग्रंथ ।
परमार्थग्रंथेंविण व्यर्थ । गाथागोवी ॥ ५९ ॥
म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार ।
तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ॥ ६० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
श्रवणनिरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ ७.९

समास दहावा : देहांतनिरूपण
॥ श्रीराम ॥
मिथ्या तेंचि जालें सत्य । सत्य तेंचि जालें असत्य ।
मायाविभ्रमाचें कृत्य । ऐसें असे पाहातां ॥ १ ॥
सत्य कळावयाकारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।
तरी उठेना धरणें । असत्याचें ॥ २ ॥
असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ जालें ।
सत्य असोन हरपलें । जेथील तेथें ॥ ३ ॥
वेद शास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चयो करिती ।
तरि न ये आत्मप्रचीती । सत्य स्वरूप ॥ ४ ॥
सत्य असोन आच्छादलें । मिथ्या नसोन सत्य जालें ।
ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां ॥ ५ ॥
ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं ।
संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ॥ ६ ॥
मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण ।
तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७ ॥
तेणें समाधान जालें । चित्त चैतन्यीं मिळालें ।
निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तूसी ॥ ८ ॥

प्रारब्धें टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो ।
आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कलेवर ॥ ९ ॥
ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार ।
जेथें पडे तेचि सार । पुण्यभूमी ॥ १० ॥
साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।
साधू न येतां जिणें व्यर्थ । तया पुण्यक्षेत्रांचें ॥ ११ ॥
पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें हें शरीर ।
हा इतर जनांचा विचार । साधु तोंचि नित्यमुक्त ॥ १२ ॥
उत्तरायण तें उत्तम । दक्षिणायन तें अधम ।
हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेही ॥ १३ ॥
शुक्लपक्ष उत्तरायण । गृहीं दीप दिवामरण ।
अंतीं रहावें स्मरण । गतीकारणें ॥ १४ ॥
इतुकें नलगे योगियासी । तो जितचि मुक्त पुण्यराशी ।
तिलांजली पापपुण्यासी । दिधली तेणें ॥ १५ ॥
देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला ।
त्यास म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ॥ १६ ॥
जनांचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत ।
ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ॥ १७ ॥
जितां सार्थक नाहीं केलें । व्यर्थ आयुष्य निघोन गेलें ।
मुळीं धान्यचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैंचें ॥ १८ ॥
जरी केलें ईश्वरभजन । तरी तो होइजे पावन ।
जैसें वेव्हारितां धन । राशी माथां लाभे ॥ १९ ॥
दिधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना ।
ऐसें हें वाक्य जनां । ठाउकेंचि आहे ॥ २० ॥
न करितां सेवेच्या व्यापारा । स्वामीस म्हणे कोठें मुशारा ।
तैसें अंतीं अभक्त नरा । स्वहित न घडे ॥ २१ ॥
जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्या कैंची होईल मुक्ती ।
असो जे जे ऐसें करिती । ते ते पावती तैसेंचि ॥ २२ ॥
एवं न करितां भगवद्भजन । अंतीं न होइजे पावन ।
जरी आलें बरवें मरण । तरी भक्तिविण अधोगती ॥ २३ ॥
म्हणौन साधूनें आपुलें । जीत असतांच सार्थक केलें ।
शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ॥ २४ ॥
जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं ।
अथवा पडो स्मशानीं । तरी ते धन्य जाले ॥ २५ ॥
साधूंचा देह खितपला । अथवा श्वानादिकीं भक्षिला ।
हें प्रशस्त न वाटे जनांला । मंदबुद्धीस्तव ॥ २६ ॥
अंत बरा नव्हेचि म्हणोन । कष्टी होती इतर जन ।
परी ते बापुडे अज्ञान । नेणती वर्म ॥ २७ ॥
जो जन्मलाचि नाहीं ठायींचा । त्यास मृत्यु येईल कैंचा ।
विवेकबळें जन्ममृत्यूचा । घोट भरिला जेणें ॥ २८ ॥
स्वरूपानुसंधानबळें । सगळीच माया नाडळे ।
तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ २९ ॥
तो जित असतांचि मेला । मरणास मारून जियाला ।
जन्म मृत्यु न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ ३० ॥
तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा ।
दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ ३१ ॥
असो ऐसे साधु जन । त्यांचें घडलिया भजन ।
तेणें भजनें पावन । इतर जन होती ॥ ३२ ॥
सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केलाच करावा विवेक ।
विवेक केलिया तर्क । फुटे निरूपणीं ॥ ३३ ॥
हेंचि साधकासी निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें ।
तुमचेंहि समाधान बाणे । साधूच ऐसें ॥ ३४ ॥
जो संतांसी शरण गेला । तो संतचि होऊन ठेला ।
इतर जनां उपयोगा आला । कृपाळुपणें ॥ ३५ ॥
ऐसें संतांचें महिमान । संतसंगें होतें ज्ञान ।
सत्संगापरतें साधन । आणिक नाहीं ॥ ३६ ॥
गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें ।
क्रियाशुद्ध निर्धारें । पाविजे पद ॥ ३७ ॥
परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन ।
सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात बाणे ॥ ३८ ॥
देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थकचि करावें ।
भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें ॥ ३९ ॥
शरणागताची वाहे चिंता । तो येक सद्गुरु दाता ।
जैसें बाळका वाढवी माता । नाना यत्नेंकरूनी ॥ ४० ॥
म्हणोनि सद्गुरूचें भजन । जयास घडे तोचि धन्य ।
सद्गुरुवीण समाधान । आणिक नाहीं ॥ ४१ ॥
सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा शेवट ।
येथें सांगितलें स्पष्ट । सद्गुरुभजन ॥ ४२ ॥
सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायक दुसरें नाहीं ।
जयांस न मने तिहीं । अवलोकावी गुरुगीता ॥ ४३ ॥
तेथें निरूपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें ।
याकारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ॥ ४४ ॥
जो ये ग्रंथींचा विवेक । विवंचून पाहे साधक ।
तयास सांपडे येक । निश्चयो ज्ञानाचा ॥ ४५ ॥
ज्या ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणूं नये प्राकृत ।
सत्य जाणावा वेदांत । अर्थाविषयीं ॥ ४६ ॥
प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहातां मिळे ।
आणि समाधान निवळे । अंतर्यामीं ॥ ४७ ॥
तें प्राकृत म्हणों नये । जेथें ज्ञानाचा उपाय ।
मूर्खासि हें कळे काय । मर्कटा नारिकेळ जैसें ॥ ४८ ॥
आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें ।
शिंपीमधील मुक्त उणें । म्हणों नये ॥ ४९ ॥
जेथें नेति नेति म्हणती श्रुती । तेथें न चले भाषाव्युत्पत्ती ।
परब्रह्म आदि अंतीं । अनुर्वाच्य ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहांतनिरूपणनाम समास दहावा ॥ १० ॥ ७.१०

जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ दशक सातवा समाप्त ॥

Encoded by Sunder Hattangadi.
Proofread by Sunder Hattangadi and Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni